## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना–महाराष्ट्र
## जिल्हा परिषद, बुलडाणा

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा सन 2005 अंतर्गत
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना–महाराष्ट्र
**राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा–2005**

अकुशल काम करण्यास तयार (इच्छुक) असलेल्या कोणत्याही ग्रामीण कुटुंबास अर्थिक वर्षात 100 दिवसांचा रोजगार देण्याची हमी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाने दिली आहे.

### कायद्याचे उद्‌दीष्ट

रोजगार हमीतुन श्रमाचे काम करण्यास तयार असलेल्या मजुरांना श्रमाची कामे उपलब्ध करुन देण्यासोबतच उत्पादक, टिकाऊ मालमत्तांची निर्मीती करणे, पर्यावरण संरक्षण, ग्रामीण महिला सबलीकरण, ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर रोखणे इत्यादी.

### योजनेची वैशिष्टये

- ग्रामीण क्षेत्रातील कुटुंबीयांना एका आर्थिक वर्षात कमीत कमी 100 दिवसाच्या रोजगाराची हमी देणारा कायदा.
- कामाची निवड, नियोजन व अंमलबजावणी यामध्ये ग्रामपंचायतीचा संपूर्ण सहभाग
- संपूर्ण पारदर्शकता.
- सामाजिक अंकेक्षण.
- मजुर कुटुंबाची नोंदणी, रोजगार पत्रक(जॉबकार्ड), काम उपलब्ध करून न दिल्यास बेरोजगार भत्ता देण्याची तरतुद

## नियोजन आणि नियोजन आराखडा तयार करणे

## प्रस्तावना

- जिल्हास्तरावरील जिल्हाधिकारी हे जिल्हा कार्यक्रम समन्वयक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) हे सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक म्हणून काम पाहतात.
- पंचायत समिती स्तरावर तहसिलदार हे कार्यक्रम अधिकारी व गट विकास अधिकारी हे सह कार्यक्रम अधिकारी म्हणून काम पाहतात.
- वार्षिक नियोजनातील किमान 50 टक्के किंमतीपर्यंतची कामे ग्राम पंचायत मार्फत करणे आवश्यक आहेत.
- कामांची निवड ग्रामसभे मार्फतच करण्यात येते.
- मागणी केल्यानंतर 15 दिवसात रोजगार उपलब्ध करुन देणे शक्य होणे हे यशस्वी नियोजनाचे सुचक आहे. चांगल्या प्रतीची मालमत्ता निर्माण होईल या दृष्टीने कामांचे आराखडे आणि कामांची निवड होणे आवश्यक आहे.
- मुदतीत रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी पूर्व नियोजनाची आवश्यकता आहे.
- आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपूर्वी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामांना प्राथमिक मंजूरी घेण्यासाठी सह कार्यक्रम अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांच्याकडे पं.स.ची मंजूरी घेण्यासाठी वार्षीक आराखडा किंवा प्रस्ताव पाठविण्याची जबाबदारी कलम 16(4) प्रमाणे ग्राम पंचायतीची आहे.
- पंचायत समिती क्षेत्रातुन येणारी रोजगाराची मागणी आणि ग्रामीण रोजगार हमी कामांच्या प्रस्तावमधून निर्माण होऊ शकणारा रोजगार यांची सांगड घालण्याची जबाबदारी सह कार्यक्रम अधिकारी यांची आहे. यासाठी पंचायत समिती क्षेत्रातील सर्व ग्रामपंचायतीचे प्रस्ताव एकत्रित करुन तालुक्यासाठी एक आराखडा त्यांनी तयार केला पाहिजे.

- तालुक्यासाठी तयार केलेल्या आराखडयास पंचायत समिती मान्यता देऊन तो जिल्हा परिषदेकडे पाठविते. जिल्हा परिषद प्राप्त सर्व तालुक्यांचे आराखडे मंजुरीसाठी जि.प.सभेसमोर ठेवुन मंजुरी घेते.

## कुटुंब नोंदणी आणि रोजगार पत्रकांचे वाटप

### प्रस्तावना

**अ) पात्रता –**

नोंदणी केलेल्या कुटुंबातील सर्व प्रौढ सदस्यांना रोजगार मागणीसाठी अर्ज करता येतो. सदर व्यक्ती स्थानिक निवासी असणे आवश्यक आहे तसेच कुटुंब म्हणून नोंदणीसाठी ग्रामपंचायतीकडे अर्ज करणे आवश्यक आहे. (जॉबकार्डसाठी नमुना कं.1 मध्ये आवश्यक माहिती भरुन ग्रा.पं.कडे सादर करुन जॉबकार्ड प्राप्त करावे. छायाचित्र काढण्याची व्यवस्था ही निश्चित दिवशी शासना मार्फत करण्यात येईल)

रोजगार मागणीसाठी अर्ज

रोजगार मागणी साठी अर्ज नमुना क्र.4 मध्ये ग्रा.पं.कडे सादर करावा व त्याची पोहच घ्यावी. रोजगार मागणी करतांना जॉबकार्ड असणे आवश्यक आहे.

मजुरीचे दर –

1. किमान वेतन अधिनियम, 1948 अंतर्गत केंद्र शासन मजूरीचे दर ठरवील ते दर सध्या रु.162/– दर आहे.
2. स्त्री पुरुषांना समान दराने वेतन मिळेल.
3. मजुरी ही मजुराचे पोष्टाचे खाते किंवा बॅकेच्या खात्यामधुनच करण्यात येते.
4. मजुरी ही केलेल्या कामाचे मोबदल्यावर देण्यात येते.